MHOS140009652025

दाखल दिनांक : ०४/०८/२०२१
नोंदणी दिनांक : १०/०८/२०२१
निकाल दिनांक : ३०/०६/२०२६
कालावधीः ४ वर्ष, १० महिने,२० दिवस.

## परंडा येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी : **श्री. अ. अ. शेख**)

**नियमीत दिवाणी दावा क्र. ७९५/२०२५** **निशाणी क्र. ७८**

**जुना क्रमांक ५११/२०२१**

**सौ. फातिमा भ्र. नबीलाल शेख,**
वय–६२ वर्षे, धंदा– घरकाम
रा. लोणी, ता. परंडा, जि. उस्मानाबाद **...वादी.**

**–विरुध्द–**

**नबीलाल गुलाबसाहेब शेख,**
वय – ६४ वर्षे, धंदा – सेवानिवृत्त शिक्षक,
रा. नाईकवाडी प्लॉट, गांधीनगर, बार्शी,
जि.सोलापूर. **...प्रतिवादी**

**दावा** :– पोटगी मिळयाकरिता.

---

वादीतर्फे विधीज्ञ– श्री. आय. डी. शेख
प्रतिवादी तर्फे विधीज्ञ– श्री. एन. एम. आय. चौधरी

---

## न्या य नि र्ण य

(घोषीत दि.३०/०६/२०२६)

१. प्रस्तुतचा दावा दरमहा रु. २०,०००/–पोटगी मिळयाकरिता दाखल करण्यात आला आहे.

**न्यायनिर्णय**

**वादपत्रातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणेः-**

२. वादी व प्रतिवादी यांचा दि.२९१२.१९९२ रोजी मुस्लीम धर्म शास्त्राप्रमाणे लग्न झाले असून त्यांचे वैवाहिक संबंध अद्याप कायम आहेत. सदर लग्नसंबंधातून त्यांना अपत्य जन्माला आले नाही. प्रतिवादीसोबत लग्न होण्यापूर्वी वादीचे सन १९७८ साली सिराजोद्दीन सैफोद्दीन शेख रा. पुणे याचेसोबत लग्न झाले होते. परंतु वादीस अपत्य झाले नाही म्हणून सन १९८५ साली सिराजोद्दीन सैफोद्दीन शेख याने वादीस तलाक दिला.

३. पुढे वादपत्रातील कथन की, वादीसोबत लग्न होण्यापूर्वी प्रतिवादीचे राशिदबी हिच्यासोबत लग्न झाले होते. दोघे लोणी ता. परंडा येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणुन नोकरीस होते. त्यांना एकूण ४ अपत्ये झाली. त्यापैकी ३ मुले व १ मुलगी जन्माला आली. सन १९९२ साली प्रतिवादीच्या त्रासाला कंटाळून राशिदबी हिने स्वतःला जाळून घेवून आत्महत्या करुन घेतली. त्यावेळी प्रतिवादीचा धाकटा मुलगा दस्तगीर हा फक्त दोन वर्षाचा होता. मुलांचा सांभाळ चांगल्या पध्दतीने व्हावा म्हणून प्रतिवादीने वादीशी लग्न करण्याचा निर्णय घेतला.

४. पुढे वादपत्रातील कथन की, प्रतिवादीस पहिल्या पत्नीपासून ४ अपत्य जन्माला आल्या असल्याकारणाने वादीस अपत्य होवू दिले नाही. वादी ही मुलांचा चांगल्या प्रकारे सांभाळ करत होती आणि त्यांच्या शिक्षणाकडे योग्य पध्दतीने लक्ष देत होती. वादीने स्वतः दुग्ध विक्रीचा व्यवसाय सुरु केला आणि शिलाईचे काम करुन उत्पन्न घेत होते. वादीने वर नमूद व्यवसायापासून मिळालेली संपूर्ण रक्कम

प्रतिवादीच्या मुलांच्या शिक्षणाकरिता खर्च केले. मुलांपैकी एक मुलगा एम. ए. बी.एड., दुसरा व तिसरा मुलगा एम.बी.बी.एस. एमडी झाले आहेत. प्रतिवादीची मुलगी देखील एम.बी.बी.एस. एमडी चे शिक्षण पूर्ण केले आहे. वादीने मुलांच्या शिक्षणाकरिता व त्यांच्या लग्नाकरिता स्वतः बचत केलेली रक्कम खर्च केली आहे.

५. पुढे वादपत्रातील कथन की, सन २०१६ मध्ये प्रतिवादी हा कौडगाव येथील जिल्हा परिषद शाळेतून मुख्याध्यापक म्हणून सेवानिवृत्त झाला आहे. प्रतिवादी हा सेवानिवृत्त झाल्यानंतर तो वादीकडे दुर्लक्ष करु लागला आणि त्याच्या स्वभावात बदल झाला. प्रतिवादीच्या मनात दुसरे लग्न करण्याचा विचार येवू लागला. वादी ही प्रतिवादीस सोडून जावे या हेतूने तो वादीस म्हणत असे की,"तू मला पसंत नाहीस,मी श्रीमंत असल्याने मला या वयात देखील पंचवीस ते तीस वर्षाच्या मुली मिळू शकतात, मी तूला कामवाली बाई म्हणून घरात आणली आहे." असे म्हणून वादीस अपमानास्पद वागणूक देत होता. प्रतिवादी हा वादीस मारहाण करुन तिचा शारिरीक छळदेखील केलेला आहे. प्रतिवादी हा वादीच्या चारित्र्यावर संशय घेवून तिला अश्लील भाषेत बोलत होता. वादी ही आत्महत्या करुन घ्यावी म्हणून प्रतिवादी हा तिचा शारिरीक व मानसिक छळ करत होता. प्रतिवादीस बाहेरख्यालीपणाचा नाद पूर्वीपासून होता व आहे.

६. पुढे वादपत्रातील कथन की, प्रतिवादीस सेवानिवृत्तीनंतर भविष्य निर्वाह निधी व इतर भत्त्याच्या रकमा मिळालेल्या आहेत. घरामध्ये दुसरी महिला आणून ठेवण्याकरिता प्रतिवादीने वादीच्या इच्छेविरुध्द तिला बार्शीच्या घरातून लोणी

ता.परंडा येथील घरात एकटीलाच सोडून दिले आणि प्रतिवादी हा एकटाच बार्शी येथील घरात राहू लागला. प्रतिवादीचेच सर्व मुले हे नोकरीनिमित्त परगावी राहत होते आणि मुलगी सासरी नांदत होती. प्रतिवादी हा सन २०१६ पासून वादीचा त्याग करुन तिच्याकडे दुर्लक्ष केले. प्रतिवादी हा दुसरे लग्न करुन घेण्यासाठी स्वतःचे फोटो मॅरेज ब्युरोकडे पाठवित होता.

७. पुढे वादपत्रातील कथन की, वादी ही वयोवृध्द असून तिला कोणतेही कामधंदा होत नाही. वादीस उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही आणि ती पूर्णतः प्रतिवादीवर अवलंबून आहे. प्रतिवादी हा वादीच्या उदरनिर्वाह व औषधोपचाराची कोणतीही काळजी घेत नसल्यामुळे तिची उपासमार होत आहे. याउलट, प्रतिवादीची आर्थिक परिस्थिती चांगली असून त्यास दरमहा रु.३०,१५०/- सेवानिवृत्त वेतन मिळत आहे. प्रतिवादीस सुधारित अंश राशिकरण रक्कम रु. ७,७५,४७९/- मिळणार असून यापूर्वी त्यास रु. ४,७२,१२४/ इतकी रक्कम मिळालेली आहे. याशिवाय प्रतिवादीच्या नावे मौजे रुई भालगाव ता. बार्शी येथे सहा एकर शेतजमीन असून त्यात एक बंगला बांधलेला आहे. प्रतिवादीच्या नावे खडूस ता. वाळा जि. ठाणे येथे दोन बंगले, पुणे येथे एक बंगला, बार्शी येथे एक बंगला असून ते भाडयाने दिलेले आहेत. प्रतिवादीस घरभाडे व शेती उत्पन्नापासून दरमहा रु. ७०,०००/- चे उत्पन्न मिळत आहे. वादीस तिच्या उदरनिर्वाह व औषधोपचारासाठी दरमहा रु. २०,०००/- पोटगीची आवश्यकता आहे. सदरची पोटगीची रक्कम देण्याची प्रतिवादीची ऐपत आहे. तरी, वादीस दरमहा रु. २०,०००/- पोटगी देणेबाबत प्रतिवादीस आदेश व्हावेत. प्रतिवादी हा पोटगीची रक्कम देण्यास कसुर केल्यास त्याचा

बोजा प्रतिवादीस मिळत असलेल्या सेवानिवृत्त वेतन व अंश राशिकरणाच्या रक्कमेवर ठेवण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

८. प्रतिवादीने त्याची लेखी कैफियत निशाणी क्र. २१ अनुसार दाखल करुन वादपत्रातील बहुतांश मजकूर नाकारलेला आहे. प्रतिवादीने वादीसोबत असलेले नातेसंबंध नाकारलेले नाहीत. पुढे त्याचे कथन की, लग्नानंतर वादी व प्रतिवादी हे दोघे लोणी ता. परंडा येथे राहत होते.वादी ही प्रतिवादीच्या मुलांची व्यवस्थित काळजी घेत नव्हती आणि त्यांना मारहाण करुन त्रास देण्यास सुरुवात केली. वादीचा भाउ व वडिल दोघे परंडा नगरपरिषदचे माजी नगराध्यक्ष होते. त्यामुळे वादी ही प्रतिवादीस उध्दटपणे बोलून अपमानास्पद वागणूक देत होती. वादी ही प्रतिवादीच्या मुलांना त्रास देत असल्याकारणाने त्याने सर्व मुलांना शिक्षणासाठी परगावी वसतिगृहात ठेवले.

९. पुढे प्रतिवादीचे कथन की, त्याचे व वादीचे जमत नसल्याकारणाने सन २०११-१२ पासून दोघे विभक्त राहत होते, त्यानंतर वादी व प्रतिवादी हे कधीही एकत्र येवून संसार केला नाही. प्रतिवादीने कायमस्वरुपी पोटगी म्हणून वादीस रु.४,००,०००/- दिले आहेत. सदरची रक्कम प्रतिवादीने वादीच्या बँक खात्यात वेळोवेळी जमा केली आहे. प्रतिवादी हा बार्शी येथे एकटाच राहून मुलांचे शैक्षणिक खर्च व लग्नाचा खर्च स्वतः केला आहे. सन २०११-१२ सालापासून वादी ही उस्मानाबादचे तत्कालीन पोलीस अधीक्षक यांच्या संपर्कात राहून फोनवर तासनतास बोलत होती. वादी ही नेहमी प्रतिवादीस खोटया केसेसमध्ये गुंतविण्याची धमकी देत

होती.

१०. पुढे प्रतिवादीचे कथन की, मागील सात वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून वादी व प्रतिवादी हे विभक्त राहत असल्याकारणाने इस्लाम शरियतप्रमाणे त्यांचे पती-पत्नीचे नाते संपुष्टात आलेले आहेत. प्रतिवादी हा वादीचे सर्व चुका माफ करुन तिला नांदण्यास येण्याची विनंती केली असता, तिने प्रतिवादीकडे नांदण्यास येण्यास नकार दिला आहे. प्रतिवादीने तलाक-ए-बिद्दत (तलाक-ए-रजई) अनुसार प्रत्येक महिन्यास सतत तीन महिने तलाकच्या नोटीसा पाठवून नांदण्यास येण्याची संधी दिली असता वादीने प्रतिवादीकडे नांदण्यास येण्यास नकार दिला. त्यामुळे तलाक-ए-बिद्दत (तलाक-ए-रजई) अनुसार वादी व प्रतिवादीमध्ये कायदेशीर तलाक झालेला आहे आणि त्यांच्यातील वैवाहिक नाते संपुष्टात आले आहे. प्रतिवादीने तलाक-ए-बिद्दत (तलाक-ए-रजई) वादीस दिल्याबाबत दैनिक वृत्तपत्रात तसे जाहीर प्रगटन केल आहे. त्यामुळे वादीस प्रतिवादीकडून पोटगी मागण्याचा अधिकार प्राप्त होत नाही.

११. पुढे प्रतिवादीचे कथन की, मुलांच्या शैक्षणिक खर्चाकरिता व त्यांच्या लग्नाकरिता प्रतिवादीने कर्ज काढलेले होते. प्रतिवादीस दरमहा रु. १०,०००/- कर्जाचा हप्ता भरावा लागत आहे. प्रतिवादीस उच्च रक्तदाबाचा त्रास असून त्याकरिता औषधोपचारासाठी दरमहा रु. १०,०००/- ते १२,०००/- खर्च येत आहे. तसेच प्रतिवादीस घर मिळकतीचे कर भरावे लागतात आणि घरगुती सफाई कामगारास दरमहा रु. ३,००० पगार द्यावा लागतो. वरीलप्रमाणे संपूर्ण खर्च प्रतिवादी हा त्यास मिळत असलेल्या सेवानिवृत्ती वेतनातून करत आहे. प्रतिवादीकडे वरीलप्रमाणे खर्च

वजा जाता पुरेशी रक्कम शिल्लक राहत नाही त्यामुळे त्याची वादीस दरमहा रु. २०,०००/- पोटगी देण्याची ऐपत नाही. वादीने अंश-राशिकरणची रक्कम रु. ७,७५,४८९/- या रक्कमेवर पोटगीचा बोजा ठेवण्याची मागणी चुकीच्या पध्दतीने केली आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता वादीचा दावा खर्चासह नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

१२. उभयपक्षांचे लेखी कथन व दाखल कागदपत्रांच्या आधारे माझे पूर्व न्यायिक अधिकारी यांनी खालील मुद्दे काढलेले असून ते मुद्दे मी कायम ठेवून माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह नोंदवित आहेः-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादी असे सिद्ध करते काय की,ती स्वतःचा सांभाळ करण्यास असमर्थ आहे? | होकारार्थी |
| २) | वादी असे सिद्ध करते काय की प्रतिवादीस पुरेसे उत्पन्नाचे साधन आहे? | होकारार्थी |
| ३) | वादी असे सिद्ध करते काय की, प्रतिवादीने तिचा सांभाळ करण्यास नकार दिला आहे? | होकारार्थी |
| ४) | वादीस पोटगी मागण्याचा अधिकार प्राप्त आहे काय ? | होकारार्थी |
| ५) | कोणता आदेश व हुकुमनामा ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

१३. वादी फातिमा शेख हिने स्वतःचा तोंडी पुरावा शपथपत्र निशाणी २९ अनुसार नोंदवून पुराव्याकामी सुधारित अंश-राशिकरण आदेशाची छायांकित प्रत कागदपत्र निशाणी ७४ सोबत दाखल केली आहे.

१४. प्रतिवादी नबीलाल शेख याने स्वतःचा तोंडी पुरावा निशाणी क्र. ४९ अनुसार नोंदवून साक्षीदार क्र. २ महेमुद फयाजोद्दीन शेख यांना निशाणी क्र. ५७ व साक्षीदार क्र.३ अदिनाथ नामदेव गायकवाड (बँकेचे सहाय्यक शाखाधिकारी) यांना निशाणी क्र. ६८ अनुसार तपासले आहे. प्रतिवादीने पुराव्याकामी खालीलप्रमाणे कागदपत्र दाखल केली आहेत.

१.वादीस पाठवून दिलेली नोटीस प्रत निशाणी क्र ३९,

२.दि. २२.११.२०२१ रोजी वादीने पाठवून दिलेल्या नोटीसची प्रत निशाणी क्र.४३,

३.दि. २२.१२.२०२१ रोजी वादीने पाठवून दिलेल्या नोटीसची प्रत निशाणी क्र. ४४

४.तलाकचे स्मरणपत्र निशाणी क्र. ५०, ५१ व ५२ ,

५.वृत्तपत्रात प्रसिध्द केलेली तलाकची नोटीस निशाणी क्र. ५३

६. वादीच्या नावे असलेले बॅक खाते उता-याची प्रत निशाणी ६९

७.फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १४९/२०२१ मधील निशाणी क्र. १९ वर पारीत झालेल्या आदेशाची प्रत

१५. उभय पक्षाच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

**मुद्दे क्र.१ ते ५ करिताः**

१६. सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यांची चर्चा एकत्ररित्या करण्यात येत आहे. उभयपक्षातील अविवादीत मुद्दे असे आहेत की, प्रतिवादीशी लग्न होण्यापूर्वी वादीचे सिराजोद्दीन शेख रा. पुणे याच्यासोबत सन १९७८ साली लग्न झाले होते. परंतु, वादीस अपत्य जन्माला येत नसल्यामुळे सन १९८५ साली सिराजोद्दीन शेख याने वादीस तलाक दिला. वादीशी लग्न करण्यापूर्वी प्रतिवादीचे

राशिदबी हिच्याशी लग्न झाले होते. सदर लग्नसंबंधातून त्यांना एकूण ४ अपत्ये जन्माला आली. सर्व चारही मुले सुशिक्षित असून आपापला व्यवसाय व नोकरी करीत आहेत आणि चारही मुलांचे लग्न झालेले आहेत. सन १९९२ साली राशिदबी ही मयत झाली. तिच्या मृत्यूनंतर दि. २९.१२.१९९२ रोजी प्रतिवादीने वादीशी मुस्लीम धर्म शास्त्राप्रमाणे लग्न केले. लग्नाच्या वेळी प्रतिवादी हा सहशिक्षक म्हणून जिल्हा परिषद शाळेत नोकरीस होता. प्रतिवादी हा सन २०१६ मध्ये मुख्याध्यापक या पदावरुन सेवानिवृत्त झाला आहे. लग्नानंतर वादी व प्रतिवादी दोघे लोणी ता. परंडा येथे राहण्यास होते.

१७. प्रतिवादीने प्रस्तुत प्रकरणात असा बचाव घेतला आहे की, दि.०४.१०.२०२१, दि.०४.११.२०२१ व दि.०४.१२.२०२१ रोजी वादीस पाठविण्यात आलेल्या तलाक-ए-बिद्दतच्या नोटीसाच्या आधारे त्यांच्यातील पती-पत्नीचे नातेसंबंध संपुष्टात आलेले आहेत. वादीने तिच्या उलट तपासात वर नमूद तिन्ही नोटीसा तिला मिळालेल्या होत्या आणि सदरच्या नोटीसांना तिने प्रतिउत्तर प्रतिवादीस पाठवून दिल्याचे कथन केले आहे. प्रतिवादीने त्याच्या लेखी कैफियतीत व साक्षीपुराव्यात वादीस तलाक-ए-बिद्दत पध्दतीने तलाक दिल्याचे कथन केले आहे. **सायरा बानू विरुध्द युनियन ऑफ इंडिया २०१७** या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने "*तलाक-ए-बिद्दत पूर्णपणे अवैध व संविधानातील अनुच्छेद १४ मधील समानतेच्या अधिकाराचे उल्लंघन करणारे आहे, तसेच कुराणात नमूद केल्याप्रमाणे तलाकपूर्वी समेट व मध्यस्थीची प्रक्रिया राबविणे अत्यंत आवश्यक आहे,*"' असे निष्कर्ष नोंदविले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाने वर नमूद प्रकरणात

नोंदविलेल्या निष्कर्षाच्या आधारे केंद्र शासनाने मुस्लीम महिला (विवाहावरील हक्काचे संरक्षण) कायदा २०१९ अंमलात आणला. वर नमूद कायद्यातील कलम ३ अनुसार तलाक-ए-बिद्दत बेकायदेशीर असल्याचे ठरविण्यात आले आहे. प्रतिवादीने वादीस तलाक-ए-बिद्दत या पध्दतीने दिलेला तलाक हा वर नमूद कायद्यातील कलम ३ अनुसार बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट झाले आहे.

१८. मुस्लीम धर्मात तलाक-ए-अहसन आणि तलाक-ए-हसन या दोन पध्दतींना मान्यता प्राप्त आहे. **शमीम आरा विरुध्द उत्तरप्रदेश राज्य (२००२)** आणि **सायरा बानू विरुध्द युनियन ऑफ इंडिया (२०१७)** या दोन्ही प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने असे निष्कर्ष नोंदविले आहे की, तलाक-ए-अहसन आणि तलाक-ए-हसन "*या दोन्ही पध्दतीने तलाक देण्यापूर्वी पती-पत्नीमध्ये समेट घडवून आणण्याचा मध्यस्थीमार्फत प्रयत्न करणे आवश्यक आहे. मध्यस्थीसाठी पतीच्या कुटुंबातून एक सदस्य आणि पत्नीच्या कुटुंबातून एक सदस्य नियुक्त करुन असलेले मतभेद किंवा वाद चर्चेद्वारे मिटवण्याचा प्रयत्न होणे आवश्यक आहे."* प्रतिवादीने दाखल केलेले दि.०४.१०.२०२१, दि.०४.११.२०२१ व दिनांक ०४.१२.२०२१ रोजीचे नोटीसा व तलाकचे स्मरणपत्र (निशाणी क्र. ३९,४० ,४१,५०,५१ व ५२) चे अवलोकन केले असता प्रतिवादीने दि.३०.०९.२०२१ रोजी वादीस तलाक-ए-हसन या पध्दतीने साक्षीदारासमक्ष तलाक दिल्याचा उल्लेख केला आहे. सदरच्या नोटीसा स्मरणपत्रासह वादीस मिळालेल्या आहेत. नोटीस नि. क्र. ३९,४० व ४१ मध्ये प्रतिवादीने कोणत्या साक्षीदारासमक्ष तलाक-ए-हसन या पध्दतीने पहिला, दुसरा व तिसरा तलाक दिला होता, याचा तपशील साक्षीदाराच्या नावासह नमूद

केला नाही. या उपरही प्रतिवादी व त्याचा साक्षीदार महेमूद फयाजोद्दीन शेख यांच्या साक्षीत देखील पहिला तलाक दि. ३०.०९.२०२१ रोजी वादीस देण्यात आला होता, याचा उल्लेख करण्यात आला नाही. तसेच दोघांच्या साक्षीत वादीस कोणत्या पध्दतीने तलाक देण्यात आला होता, याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. पुढे न्यायालयासमोर असाही पुरावा आला आहे की,प्रतिवादीने वादीस तलाक देण्यापूर्वी त्यांच्यात असलेले मतभेद व वाद मिटवण्याकरिता मध्यस्थीमार्फत प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. निश्चितच वर नमूद न्यायनिवाडयातील निष्कर्षाप्रमाणे प्रतिवादीने तलाक देण्यापूर्वीची महत्त्वाची प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. सबब, वर नमूद सर्व कायदेशीर बाबींचा विचार केला असता, प्रतिवादीने वादीस तलाक दिला आहे, ही वस्तुस्थिती निर्विवादपणे सिध्द झाली नाही. सबब, वादी व प्रतिवादी यांचे वैवाहिक नाते अद्याप कायम आहेत, असे स्पष्ट होत आहे.

१९. प्रतिवादीने वादीच्या चारित्र्यावर संशय उपस्थित केल्याचे दिसून येत आहे. परंतु, प्रतिवादीने त्याच्या कथनाच्या पुष्ठयार्थ कोणताही सबळ पुरावा न्यायालयासमोर सादर केलेला नाही. वादीच्या साक्षीवरुन असे दिसून येते की, सध्या तिचे वय ६२ वर्षाचे असून ती लोणी येथे भाडयाच्या घरात राहत आहे. पुढे वादीच्या साक्षीवरुन असे दिसून येते की, वादीस शेतातील मजुरीचे काम मिळाल्यास ती दरमहा रु. ५००/- ते १,०००/- कमवित आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार त्याने वादीस कायमस्वरुपी पोटगी म्हणून रु. ४,००,०००/- तिच्या बँक खात्यात वेळोवळी जमा केले आहेत. प्रतिवादीने त्याच्या कथनाच्या पुष्ठयार्थ साक्षीदार आदिनाथ गायकवाड (बँकेचे सहाय्यक शाखाधिकारी) यांना न्यायालयात तपासले

आहे. श्री. आदिनाथ गायकवाड यांनी यांच्या साक्षीच्या पूष्ठयार्थ वादीच्या नावे असलेले बँक खात्याचा उतारा नि. क्र. ६९ अनुसार दाखल केला आहे. साक्षीदार आदिनाथ गायकवाड यांच्या साक्षीवरुन असे स्पष्ट होत आहे की, प्रतिवादीने वादीच्या बँक खात्यात कधीही कोणतीही रक्कम जमा केलेली नाही, त्यामुळे प्रतिवादीने वादीस कायमस्वरुपी पोटगी रु. ४,००,०००/- अदा केल्याची वस्तुस्थिती सिध्द झाली नाही. वादीच्या वयाचा विचार केला असता तिने कमवित असलेले रु. ५००/- ते १,०००/- तिच्या उदरनिर्वाह व औषधोपचारासाठी पुरेसे आहेत, असा निष्कर्ष काढता येणार नाही. वादीस उत्पन्नाचे साधन आहे आणि ती स्वतःचा सांभाळ करण्यास समर्थ आहे, ही वस्तुस्थिती प्रतिवादीने सिध्द केली नाही.

२०. प्रतिवादीने त्याच्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, तो मुख्याध्यापक या पदावरुन सेवानिवृत्त झाला असून त्यास दरमहा रु. ३०,०००/- सेवानिवृत्ती वेतन मिळत आहे. प्रतिवादीस दरमहा रु. १०,०००/- कर्ज हप्ता भरावा लागत आहे, ही वस्तुस्थिती सिध्द करणेकामी त्याने कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयासमोर सादर केलेला नाही. तसेच प्रतिवादीस औषधोपचाराकरिता दरमहा रु. १०,०००/- ते १२,०००/- खर्च येतो, हे दाखविण्याकरिता तसा वैद्यकीय पुरावा आणि औषध खरेदी केलयाच्या पावत्या सादर केल्या नाहीत. त्याचप्रमाणे घरकाम करणा-यास रु. ३,०००/- पगाराचा खर्च येतो, याबाबतदेखील कोणताही पुरावा सादर केलेला नाही. सबब,खर्चाबाबत प्रतिवादीने वरीलप्रमाणे केलेले कथन विश्वासार्ह वाटत नाही. प्रतिवादीस अंश राशिकरणाची रक्कम रु. ४,७२,१२४/- मिळाली आहे आणि भविष्यात सुधारित अंश राशिकरण रक्कम रु. ७,७५,४७९/-

मिळणार आहेत, याबाबत वादीने कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयात सादर केलेला नाही.त्याचप्रमाणे प्रतिवादीस शेतीचे उत्पन्न आणि भाडयाचे उत्पन्न मिळत असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा वादीने सादर केलेला नाही. वरीलप्रमाणे आलेल्या पुराव्यावरुन असे स्पष्ट झाले आहे की, प्रतिवादीस दरमहा रु.३०,०००/- सेवानिवृत्त वेतन मिळत असून त्यास पुरेसे उत्पन्नाचे साधन आहे.

२१. वादीच्या साक्षीपुराव्यावरुन असे दिसून येते की, सन २०१६ पासून वादी ही प्रतिवादीपासून विभक्त राहत आहे. प्रतिवादीने वादीस नांदविण्याबाबत कोणतेही प्रामाणिक प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. याउलट, वादीच्या चारित्र्यावर संशय घेवून तिला तलाकच्या नोटीसा पाठवून निष्काळजीपणाने सोडून दिले आहे. न्यायालयासमोर आलेल्या पुराव्यावरुन असे दिसून येते की, प्रतिवादीने वादीच्या उदरनिर्वाह व औषधोपचाराची कोणतीही काळजी न घेता तिचा सांभाळ करण्यास नकार दिला आहे. पुढे असे दिसून येते की, वादी ही पूर्णतः प्रतिवादीवर अवलंबून आहे. वादी व्यतिरिक्त प्रतिवादीवर कोणाचीही जबाबदारी नाही. सबब, वादीस प्रतिवादीकडून पोटगी मागण्याचा अधिकार प्राप्त होत आहे.

२२. प्रतिवादीस असलेल्या उत्पन्नाचा विचार केला असता वादीच्या उदरनिर्वाह आणि औषधोपचाराकरिता दरमहा रु.१०,०००/- पोटगी मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार आहे. सबब, प्रस्तुतचा दावा वादीच्या मागणीनुसार अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे. त्याअनुषंगाने मी मुद्दा क्र. १ ते ४ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## **आ दे श**

१. दावा खर्चासह अंशतः मंजुर करण्यात आला.

२. प्रतिवादीस आदेशित करण्यात येते की, त्याने वादीस दावा दाखल तारखेपासून म्हणजेच दि.०४.०८.२०२१ पासून दरमहा रु. १०,०००/-पोटगी द्यावी.

३. येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2026.06.30 13:03:37 +0530

**(अ. अ. शेख)**

दिनांक:३०/०६/२०२६. दिवाणी न्यायाधीश व.स्तर,परंडा

CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment/Order/Record and Document are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | G.I. Khobre<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Civil Court Senior Division, Paranda. |
| Date | - | 30.06.2026 |
| Order signed by the presiding officer on | - | 30.06.2026 |
| Order uploaded on | - | 30.06.2026 |